# कोर्ट विद्यमान श्री यु. पी. शिंदे, न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, गोंडपिपरी.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३६२/२०२६ नि. क्र. - २

सरकार -वि- मारोती भाऊजी बोरकुटे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०२/०५/२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दि. | : | ०२/०५/२०२६ |
| ३. | फिर्यादिदाराचे संपुर्ण नाव व पत्ता | : | महाराष्ट्र सरकार मार्फत - पो. स्टे. अधिकारी, गोंडपिपरी ता. गोंडपिपरी, जि चंद्रपुर |
| ४. | आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता | : | मारोती भाऊजी बोरकुटे, वय : २८ वर्षे व्यवसाय : चालक, रा. फुलोराहेट्टी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. |

५. (अ) अपराधाचा तपशिल

तुम्ही दिनांक ०२/०५/२०२६ रोजी १७.५० ते १८.१० वाजताचे सुमारास मौजा भंगाराम तळोधी, तह. गोंडपिपरी जि. चंद्रपुर येथे तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र. एम.एच. ३४ बी.एच. १०३९ हे सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने उभे केले असतांना मिळुन आलात आणि त्या अन्वये तुम्ही भारतीय न्याय संहितेचे (बी. एन. एस) कलम २८५ अन्वये गुन्हा केला आहे.

वरील गुन्हयासंबंधी तपशील आरोपीला मराठी भाषेत वाचुन व समजावून सांगीतला.

( यु. पी. शिंदे )

दिनांक ०५/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी (प्र. श्रे.), गोंडपिपरी

## आरोपीची जबानी

प्र. क्र. १- तुम्हाला पोलिसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय?

उत्तर - होय.

प्र. क्र. २- तुम्हाला गुन्हयाचा तपशील वाचुन व समजावुन सांगीतला तो तुम्हाला समजला काय?

उत्तर - होय.

प्र. क्र. ३- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर - मला गुन्हा कबुल आहे.

.............................................

आरोपीची सही/अंगठा

( यु. पी. शिंदे )

दिनांक ०५/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी (प्र. श्रे.), गोंडपिपरी

आदेश

आरोपीस  गुन्हा कबुली बाबत विचारणा केली असता, आरोपीने स्वतः  होवुन व स्वईच्छेने गुन्हा कबुल करीत असल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्ह्याचा तपशील व गुन्ह्याच्या शिक्षेबाबत सविस्तर सांगीतल्यांनतर सुध्दा आरोपी स्वतः होवुन गुन्हा कबुल करीत आहे. आरोपीस गुन्ह्याचे तपशील व शिक्षेबाबत समजल्यानंतर तो गुन्हा कबुल करीत असल्याची खात्री झाल्यामुळे आरोपीची  गुन्हा कबुली स्वीकृत  करण्यात येते.

आरोपीने गुन्हा कबुल केल्यामुळे आरोपीला सदर खटल्यामध्ये दोषी धरण्यात येते. आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता त्यांचा हा पहीलाच गुन्हा असुन ते गरीब असल्याचे सांगीतले व त्यांना कमीत कमी शिक्षा करण्यात यावी अशी विनंती आरोपीने केली आहे. गुन्ह्याचे स्वरूप, आरोपीने केलेले कथन व खटल्यातील परीस्थीती लक्षात घेता माझ्या मते आरोपीस कमीत कमी शिक्षा करणे न्यायोचित होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## <u>आदेश</u>

आरोपी मारोती भाऊजी बोरकुटे यास भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ नुसार दोषी धरण्यात येत असून त्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७५ अन्वये  रक्कम  रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त ) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने दंडाची रक्कम भरणेस कसुर केल्यास त्यास दहा दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

(Sd-)
( यु. पी. शिंदे )
दिनांक ०५/०६/२०२६ — न्यायदंडाधिकारी (प्र. श्रे.), गोंडपिपरी.